दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १५ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## बायपास रस्त्यांवरील रक्ताचे पाट आणि प्रशासकीयंचा निर्लज्जपणा

धुळे-सोलापूर महामार्गावरील आयआरबी पेट्रोल पंपाजवळ एका भरधाव हायवाने तीन निष्पाप विद्यार्थिनींच्या मोपेडला दिलेल्या भीषण धडकेत एका तरुणीचा चिरडून झालेला जागीच मृत्यू आणि अन्य दोघींचे जखमी होणे, ही केवळ अपघात किंवा काळाची झेप नाही. ...

---> अग्रलेख - पान 2 वर

## ईव्हीएममधील गडबड सुप्रीम कोर्टात पोहोचताचं भाजपनं मशिन्स जाळल्या... नाना पटोलेंचा खळबळजनक आरोप

**मुंबई :** काँग्रेस नेते नाना पटोले यांनी पुन्हा एकदा ईव्हीएमच्या मुद्द्यावरून भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "ना रहेगा बास, ना बजेगी बासुरी" याच म्हणीचा वापर करत भाजप आणि मोदी सरकार देशात कारभार करत असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रियेवर आणि ईव्हीएम मशीनच्या सुरक्षेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. नाना पटोले म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगापासून ते संपूर्ण निवडणूक मॅनेजमेंट आणि 'मॅच फिक्सिंग' ही भाजपच्या बाजूनं करण्याचा प्रयत्न झाला.

# प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या उपचारावेळी गोंधळ; डॉक्टर-परिचारिकेच्या वादाचा व्हिडिओ व्हायरल



### लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील घटनेची जिल्हाभर चर्चा; रुग्णसेवेवर परिणाम झाल्याचा आरोप, चौकशीची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** लाडसावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या उपचारादरम्यान डॉ. पुनम मुंडे आणि सुकेशनी साळवे परिचारिकेमध्ये झालेल्या वादामुळे आरोग्य केंद्र पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. शनिवारी घडलेल्या या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर आरोग्य केंद्रातील अंतर्गत मतभेद आणि त्याचा रुग्णसेवेवर होणारा परिणाम याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.


मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळखुंटा येथील एक गर्भवती महिला शनिवारी दुपारच्या सुमारास प्रसूतीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाली होती. उपचार प्रक्रियेदरम्यान जबाबदारीच्या

-> पान 2 वर

### व्हिडिओने वाढवली चर्चेची धग

प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. पुनम मुंडे आणि परिचारिका सुकेशनी साळवे यांच्यामधील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेची चर्चा जिल्हाभर सुरू झाली. काही सेकंदांच्या व्हिडिओमध्ये दोघींमधील बाचाबाची आणि गोंधळाचे दृश्य दिसत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आरोग्य केंद्रातील कामकाज, कर्मचाऱ्यांमधील समन्वय आणि रुग्णसेवेची गुणवत्ता याबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

### "सूचना दिल्या, समज दिली; तरीही वादच... मग कारवाई अटळ!"



"आरोग्य केंद्रात रुग्णांची सेवा अपेक्षित असताना कर्मचाऱ्यांमध्येच संघर्ष होत असेल, तर तो केवळ शिस्तभंग नसून आरोग्य व्यवस्थेच्या प्रतिमेलाही धक्का देणारा प्रकार आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवून दोषींवर कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जाणार आहे. रुग्णसेवेपेक्षा वैयक्तिक वाद महत्त्वाचे वाटत असतील, तर अशा कर्मचाऱ्यांना सेवेत ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आवश्यक असल्यास कार्यमुक्ती आणि निलंबनाबाबतचा प्रस्तावही आगामी सर्वसाधारण सभेत मांडला जाईल.

— डॉ. राधाकिसन पठाडे, जि. प. सदस्य छत्रपती संभाजीनगर

### "वाद जुना; चौकशी अहवाल वरिष्ठांकडे"

डॉ. पुनम मुंडे आणि परिचारिका सुकेशनी साळवे यांच्यामधील मतभेद हे नवीन नसून यापूर्वीही अशा तक्रारी समोर आल्या होत्या, दोघांनाही या पूर्वी रुग्णसेवेला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. प्रसूतीदरम्यान घडलेल्या वादाची चौकशी करण्यात येणार असून संबंधितांना समज देण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असून भविष्यात रुग्णसेवेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

— डॉ. नागेश सावरगावे, तालुका वैद्यकीय अधिकारी

## थोडक्यात वार्ता

### 'मातोश्री'वर ठाकरे गटाच्या खासदारांची बैठक

**मुंबई:** शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे खासदार आपल्या गळाला लावल्याची चर्चा सुरू आहे. या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीवर खासदारांची बैठक बोलावली आहे. या बैठकीला किती खासदार उपस्थित राहणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मुंबईत बैठक होत असूनही मुंबईतील एक खासदार अनुपस्थित असल्याची माहिती आहे. तर, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे नॉट रिचेबल असल्याने एकच खळबळ उडाली. आज दुपारी १२.३० वाजता बोलावण्यात आलेल्या बैठकीसाठी किती खासदार आले, याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच एकनाथ शिंदे यांच्यासोबत ठाकरे गटाच्या ९ पैकी ७ खासदारांनी बैठक केल्याची माहिती समोर आली होती.

### भारतीय लष्कराच्या नव्या नियमावलीने 174 पानांचा शिस्तीचा नवा कायदा

**नवी दिल्ली:** भारतीय लष्कराने आपल्या गणवेश नियमांमध्ये मोठे बदल करत अधिक भारतीय संस्कृती आणि ओळख प्रतिबिंबित करणारी नवी ड्रेस कोड प्रणाली लागू केली आहे. 'आर्मी युनिफॉर्म्स-2026' या 174 पानी नियमावलीत जवळपास दशकभरातील सर्वात व्यापक बदल करण्यात आले असून ब्रिटिशकालीन अनेक परंपरा, प्रतीके आणि शब्दावली हटवण्यात आली आहे. या बदलांमधील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे अधिकाऱ्यांच्या औपचारिक पोशाखात क्लोज्ड-नेक बंदी जॅकेटचा समावेश. भारतीय ओळख अधिक ठळक करण्याच्या प्रयत्नांचा हा भाग मानला जात असून ब्रिटिशकालीन परंपरांचा प्रभाव कमी करण्याच्या दिशेने लष्कराचे हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे मानले जात आहे.

### TMCच्या खासदार 'नॅशनलिस्ट सिटिझन पार्टीत होणार विलीनीकरण

**कोलकाता/नवी दिल्ली:** पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेस (TMC) मध्ये वाढत चाललेल्या बंडखोरीमुळे पक्षातील अंतर्गत संकट आणखी तीव्र झाले आहे. पक्षातील बंडखोर खासदार लवकरच दुसऱ्या राजकीय पक्षात प्रवेश करून केंद्रातील भाजपप्रणीत NDA (एनडीए) सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. स्वतंत्र संसदीय गट स्थापन करताना उद्भवणाऱ्या तांत्रिक आणि कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी बंडखोर खासदार दुसऱ्या पक्षात विलीन होण्याचा पर्याय गांभीर्याने विचारात घेत आहेत. यासाठी ते Nationalist Citizen Party या पक्षात प्रवेश करू शकतात. या पक्षाचे मुख्य राजकीय लक्ष पश्चिम बंगाल, आसाम आणि त्रिपुरा या राज्यांवर केंद्रित असल्याचे सांगितले जात आहे. 'हिंदुस्तान टाइम्स'च्या वृत्तानुसार, नॅशनलिस्ट सिटिझन पार्टीचा मुख्य आधार त्रिपुरामध्ये आहे.

### तीन दिवसानंतर रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन मागे

**पंढरपूर :** शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे गेल्या तीन दिवसांपासून पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरु होते. आज अखेर त्यांनी तीन दिवसानंतर उपोषण सोडले आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत रोहित पवारांनी उपोषण मागे घेतले. 22 जूनच्या आधी मुंबईत बैठक होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी बोलावल्याची माहिती रोहित पवार यांनी सांगितले. आपल्या मागण्यासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्याचा विचार सरकार करत आहे. या अटीसंदर्भात काय करता येईल यासाठी आपल्याला कमिटीकडे जावे लागेल असे महाजन यांन सांगितल्याचे रोहित पवार म्हणाले. शेतकऱ्यांच्या वतीने 4 जुलैला मोठे आंदोलन घेणार आहोत असे रोहित पवार म्हणाले. आपली बैठक ठरली आहे. यामध्ये कोणतेही राजकारण नाही. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये ही आमची भूमिका असल्याचे रोहित पवार म्हणाले. यावेळी रोहित पवार यांनी गिरीश महाजन यांचे अभिनंदन केले.

## "खरं की काय"




# टेम्पो विहिरीत कोसळून 8 जणांचा मृत्यू, 6 जण बचावले

### जिल्हाधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले- मुख्यमंत्र्यांकडून 5 लाखांची मदत



**सोलापूर, 14 जून :** सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे रविवारी भरधाव वेगाने जाणारा टेम्पो विहिरीत कोसळल्याने 8 जणांचा मृत्यू झाला. या घटनेत सहा जणांना वाचवण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्तिकी यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

या घटनेचा तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, आज सोलापूरच्या पंढरपूर तालुक्यातील रंजनी गावातील एकूण 14 जण टेम्पोने म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिराच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन करून परतत असताना श्रद्धाळूंचा टेम्पो तांडूवाडी येथील एका शेतातील विहिरीत कोसळला. या दुर्घटनेत इंदुबाई दशरथ बावचे (60), पूजा अमोल सातोरे (23), पूजा बालाजी बावचे (27), अश्विनी संदीप बावचे (27), अश्विनी संदीप बावचे (14), संस्कार संदीप बावचे (14), संस्कृति संदीप बावचे (14), आरव अमोल सातोरे (8) आणि समर्थ बालाजी बावचे (6 महिने) यांचा मृत्यू झाला. तर या घटनेत 6 जणांना वाचवण्यात आले आहे. सोलापूरच्या जिल्हाधिकारी एस. कार्तिकी यांनी पंढरपूर–म्हसवड महामार्गावरील दुर्घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी या दुर्घटनेच्या त्रिस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

# आपण हिटलर नाही, संवादाचे मार्ग खुले ठेवले पाहिजेत

### दत्तात्रेय होसबळेंच्या विधानाला मोहन भागवत यांचे समर्थन



**तिरुवनंतपुरम :** पाकिस्तानशी संवादाची दारे खुली ठेवली पाहिजेत," या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस (सरकार्यवाह) दत्तात्रेय होसबळे यांच्या विधानाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी जाहीर समर्थन केले आहे. "होसबळे यांच्या विधानाचा संदर्भ शेजारील देशाच्या (पाकिस्तानच्या) सरकारशी नसून, तिथल्या सामान्य जनतेशी होता," असे महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण भागवत यांनी दिले.

तिरुवनंतपुरम येथे संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित एका विशेष संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. मे महिन्यात दत्तात्रेय होसबळे यांनी दिलेल्या एका मुलाखतीचा संदर्भ घेत जेव्हा संघाच्या भूमिकेबद्दल विचारण्यात आले, तेव्हा मोहन भागवत यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही देशाबाबत संघाचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण नसते; संघ नेहमी केंद्र सरकारच्या भूमिकेचे आणि धोरणांचे पालन करतो.

परंतु, पाकिस्तानमधील समाजाचा उल्लेख करताना सरसंघचालक म्हणाले की, आजही पाकिस्तानात असे अनेक लोक आहेत ज्यांना वाटते की भारताची फाळणी ही एक मोठी चूक होती. तिथले अनेक पत्रकारही संघाचे आणि त्याच्या कार्याचे कौतुक करतात. पाकिस्तानात एक मोठा गट असा आहे जो त्या देशाच्या मूळ विचारसरणीला आणि 'द्वि-राष्ट्र सिद्धांता'ला तीव्र विरोध करतो. आपण एकत्र राहिलो असतो तर ते दोन्ही देशांसाठी अधिक चांगले झाले असते, अशी भावना तिथल्या लोकांमध्ये आहे."

भविष्यातील संभाव्य परिस्थितीवर भाष्य करताना मोहन भागवत यांनी जर्मनीचा हुकूमशहा अडॉल्फ हिटलरचा उल्लेख केला. ते म्हणाले की, जर भारताने भविष्यात पाकिस्तानचा पूर्णपणे पराभव केला, तर तिथल्या लोकांच्या बाबतीत केवळ दोनच पर्याय उरतील, एकतर त्यांना भारतात सामावून घेणे किंवा असे वातावरण निर्माण करणे जिथे ते स्वतःच्या देशात शांततेने राहू शकतील. ते पुढे म्हणाले, "या दोन्ही परिस्थितींचा विचार करता संवादाची दारे खुली ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# दीप्तीची कमाल, वर्ल्डकपमध्ये पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात भारताचा विजय

### भारतीय महिला संघ 64 धावांनी विजयी



**भारत महिला संघ :** २० षटकांत ६ बाद १७० धावा (स्मृती मानधना ६८, हरमनप्रीत कौर ३६, रिचा घोष ३४; सादिया इक्बाल २/४१, फातिमा साना २/३३)

**पाकिस्तान महिला संघ :** १७ षटकांत सर्वबाद १०६ धावा (मुनीबा अली ४१, आलिया रियाझ १८; दीप्ती शर्मा ५/१०, श्री चरणी ३/२१)

**बर्मिंगहॅम :** अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माच्या फिरकीची जादू आणि उपकर्णधार स्मृती मानधनाच्या झंझावाती अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताने आपल्या पहिल्याच सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६४ धावांनी दारूण पराभव केला. भारताने विजयासाठी दिलेल्या १७१ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव अवघ्या १७ षटकांत १०६ धावांवर गडगडला. या दणदणीत विजयामुळे भारतीय संघाने गुणतालिकेत मोलाचे २ गुण मिळवले आहेत.

एजबॅस्टन मैदानावर झालेल्या या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि २० षटकांत ६ बाद १७० धावांची विशाल धावसंख्या उभारली. शफाली वर्मा (६ धावा) आणि जेमिमा रॉड्रिग्ज (१ धाव) या आघाडीच्या फलंदाज स्वस्तात बाद झाल्यामुळे भारताची सुरुवात खराब झाली होती. या कठीण प्रसंगात उपकर्णधार स्मृती मानधनाने मैदानाबाहेर चौफेर फटकेबाजी करत ४४ चेंडूंत ९ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६८ धावांची अप्रतिम खेळी खेळली. तिने कर्णधार हरमनप्रीत कौर (३६ धावा) सोबत तिसऱ्या विकेटसाठी ९१ धावांची भक्कम भागीदारी रचून भारताला मजबूत स्थितीत आणले. डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये यष्टीरक्षक फलंदाज रिचा घोषने अवघ्या १७ चेंडूंत ३४ धावांची तुफानी खेळी करत भारताला १७० धावांचा टप्पा पार करून दिला.

१७१ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजीसमोर अजिबात टिकता आले नाही. दीप्ती शर्माने आपल्या फिरकीच्या जादुई माऱ्याने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. तिने उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन करत 'पंच' (५ बळी) मिळवला. दीप्तीच्या या भेदक माऱ्यामुळे पाकिस्तानचा संपूर्ण संघ १७ व्या षटकात अवघ्या १०६ धावांवर बाद झाला. या मोठ्या विजयामुळे भारतीय महिला संघाने विश्वचषक मोहिमेची अत्यंत दिमाखदार सुरुवात केली असून, हा विजय आगामी सामन्यांसाठी संघाचा आत्मविश्वास वाढवणारा ठरेल.

पॉवरप्लेच्या अखेरीस पाकिस्तान १ बाद ५२ अशा भक्कम स्थितीत होता. पण दीप्तीने ४ षटकांत अवघ्या १० धावा देत ५ बळी घेतले. पाकिस्तानच्या मधल्या फळीचा कणाच मोडला. तिच्या या भेदक माऱ्यापुढे पाकिस्तानच्या फलंदाजांना खेळपट्टीवर उभे राहणेही कठीण झाले. पाकिस्तानकडून सलामीवीर मुनीबा अलीने सर्वाधिक ४१ धावा केल्या, मात्र ती झाल्यानंतर संपूर्ण संघ पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोसळला. कर्णधार फातिमा साना भोपळाही न फोडता (०) बाद झाली, तर आलिया रियाझ केवळ १८ धावा करू शकली. दरम्यान दीप्ती शर्माला नवोदित गोलंदाज श्री चरणी हिने उत्तम साथ दिली. तिने ४ षटकांत २१ धावांच्या मोबदल्यात ३ फलंदाजांना तंबूत धाडले. शेवटच्या षटकांत दीप्तीने लागोपाठ दोन चेंडूंवर दोन बळी घेत पाकिस्तानचा डाव १७ व्या षटकांत १०६ धावांवर संपुष्टात आणला आणि भारताच्या ६४ धावांच्या दणदणीत विजयावर शिक्कामोर्तब केले.




दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## बायपास रस्त्यांवरील रक्ताचे पाट आणि प्रशासकीयंचा निर्लज्जपणा

धुळे-सोलापूर महामार्गावरील आयआरबी पेट्रोल पंपाजवळ एका भरधाव हायवाने तीन निष्पाप विद्यार्थिनींच्या मोपेडला दिलेल्या भीषण धडकेत एका तरुणीचा चिरडून झालेला जागीच मृत्यू आणि अन्य दोघींचे जखमी होणे, ही केवळ अपघात किंवा काळाची झेप नाही. हा थेट प्रशासकीय अनागोंदी आणि सुस्त यंत्रणेने केलेला खून आहे. बीड बायपास आणि लगतच्या महामार्गांवर रस्ते अपघातांची मालिका अविरत सुरूच आहे, दररोज निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत, पण येथील वाहतूक शाखा आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कानठळ्या बसलेल्या प्रशासनाला अद्याप जाग आलेली नाही. एका गरीब कुटुंबाची आशा असलेल्या हुशार तरुणीचा छिन्नविच्छिन्न मृतदेह रस्त्यावर पडलेला पाहून तिच्या मैत्रिणीला भोवळ येते, पण हे रक्ताचे पाट पाहूनही प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कातडे तीळभरही सुळसुळत नाही, यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते? मृत पावलेली प्रतीक्षा सांगवे ही तरुणी कॉम्प्युटर सायन्सच्या शेवटच्या वर्षात शिकत होती आणि पुण्यामध्ये इंटर्नशिप करत होती. वडिलांच्या अपघातानंतर अंथरुणाला खिळलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी, चांगला पगार मिळवून वडिलांवर उपचार करण्याचे तिचे स्वप्न होते. मात्र, शहरातील रस्त्यांवर यमासारख्या धावणाऱ्या हायवा चालकांच्या मुजोरीने तिचे हे स्वप्न आणि एका संपूर्ण कुटुंबाचा कणाच मोडून टाकला. आयआरबी पेट्रोल पंपाजवळ रस्ता अत्यंत चिंचोळा झाला आहे, एकाच वेळी दोन वाहने जाणे कठीण होते, महामार्गावरून सुसाट वेगाने येणारी वाहने खाली उतरताना त्याच गतीने धावतात, हे साधे भौगोलिक वास्तव डोळ्यांना दिसत असतानाही तिथे गतिरोधक बसवण्याचे सौजन्य प्रशासनाने का दाखवले नाही? या निष्काळजीपणाचे उत्तर आता कोणी द्यायचे? शहरातील हायवा चालकांची मग्रुरी आणि अरेरावी आज गल्लीबोळांपर्यंत पोहोचली आहे. या अपघातातील हायवा चालक तरुणीला चिरडून गाडीसह फरार झाला, कारण त्याला माहिती आहे की आपले कोणीच काही वाकडे करू शकत नाही. सर्वात गंभीर आणि संतापजनक बाब म्हणजे, शहरातील बहुतांश हायवा हे प्रादेशिक परिवहन विभाग आणि पोलिसांच्या नाकाखाली चक्क 'नंबर प्लेट' नसताना किंवा ती लपवून भरधाव धावत असतात. विना नंबर प्लेटच्या या मृत्यूच्या गाड्या रस्त्यांवरून उघडपणे फिरतातच कशा? त्यांना कोणता राजकीय वरदहस्त लाभला आहे की आरटीओ आणि वाहतूक पोलिसांचे खिसे या गाड्यांच्या मालकांकडून दरमहा उबदार केले जातात, म्हणूनच या मुजोरीकडे कानाडोळा केला जातो? आता केवळ पंचनामे आणि अपघाताची नोंद करून कागदी घोडे नाचवण्याची मलमपट्टी थांबवावी लागेल. जोपर्यंत अशा बेजबाबदार हायवा चालकांवर आणि त्यांना विना नंबर प्लेट फिरू देणाऱ्या वाहतूक अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत हे मृत्यूचे सत्र थांबणार नाही. बीड बायपास आणि संबंधित ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसवावेत आणि नंबर प्लेट नसलेल्या प्रत्येक व्यावसायिक वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची हिंमत पोलिसांनी दाखवावी. जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा चिडलेले नागरिक रस्त्यावर उतरून या मुजोर यंत्रणेला जाब विचारल्याशिवाय राहणार नाहीत.

# भारतीय अंतराळ अर्थव्यवस्था पुढील दशकापर्यंत 45 अब्ज डॉलर्सपर्यंत झेप घेणार - डॉ. जितेंद्र सिंह

## 400 हून अधिक अंतराळ क्षेत्रातील स्टार्टअप्समुळे विकासाच्या पुढील टप्प्याला चालना

**नवी दिल्ली, 14 जून :** विज्ञान व तंत्रज्ञान आणि अंतराळ विभाग राज्य मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी, धोरणात्मक सुधारणा, खाजगी क्षेत्राची वाढती भागीदारी आणि झपाट्याने विस्तारणारी नवोन्मेष परिसंस्था यांच्या बळावर भारताची अंतराळ अर्थव्यवस्था सध्याच्या 8-9 अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून पुढील दशकात जवळपास 40-45 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वृद्धिंगत होण्यास सज्ज असल्याचे म्हटले आहे.

दिल्लीत आयोजित एका वार्ताहर परिषदेत बोलताना डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले की भारताच्या अंतराळ क्षेत्रातील परिवर्तन हे देशभरात होणाऱ्या व्यापक परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे, जिथे विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेपलीकडे जाऊन राष्ट्रीय जाणिवेचा भाग झाले आहे. ते पुढे म्हणाले की, भारताच्या वैज्ञानिक प्रगतीमध्ये नागरिक स्वतःला महत्त्वाचा घटक असल्याचे मानू लागल्याने, अलीकडील काळात विज्ञान आणि समाजमानसामध्ये वृद्धिंगत होणारा परस्पर संबंध ही सर्वांत महत्त्वपूर्ण कामगिरींपैकी एक आहे.

"भारताच्या वैज्ञानिक प्रगतीशी जोडले जाण्याचा अनुभव आणि त्यात आपलाही सहभाग असल्याची भावना त्यांना जाणवते ही सर्वांत मोठी कामगिरी आहे," असे जितेंद्र सिंह म्हणाले.

डॉ. जितेंद्र सिंह यांच्या मते, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्याशी निगडीत कार्यक्रमांमध्ये मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांचा वाढता सहभाग ही वैज्ञानिक घडामोडींमध्ये लोकांची रुची वाढल्याचे निदर्शक आहे. चांद्रयान-3 सारख्या मोहिमांमुळे अंतराळ विज्ञान हा व्यापक जनहिताचा आणि कुतूहलाचा विषय झाला आहे. त्यामुळे देशभरातील नागरिकांमध्ये अभूतपूर्व जागरूकता आणि सहभाग वाढला आहे.

अंतराळ, अणुऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञान यांसारख्या आघाडीच्या क्षेत्रात भारताच्या वाढत्या सामर्थ्याने देशाचे जागतिक स्थान अधिक बळकट झाले आहे. या यशामुळे निर्माण झालेल्या आत्मविश्वासामुळे स्वदेशी तंत्रज्ञानाची विश्वासार्हता वाढली असून, एक विश्वसनीय तंत्रज्ञान भागीदार म्हणून भारताचे स्थान अधिक भक्कम झाले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी अंतराळ क्षेत्रात घडून आलेल्या सुधारणांविषयी




देखील सांगितले. काही वर्षांपूर्वी भारतात केवळ मोजकेच अंतराळ स्टार्टअप्स होते. मात्र, आज देशात 400 पेक्षा जास्त अंतराळ स्टार्टअप्स बहुआयामी आणि वेगाने विस्तारत असलेल्या परिसंस्थेमध्ये आपले योगदान देत आहेत असे ते म्हणाले. तुलनेने अत्यंत कमी कालावधीत गाठलेल्या या यशातून भारताच्या अंतराळ अर्थव्यवस्थेच्या अफाट क्षमतेची प्रचिती येते असे ते म्हणाले.

चांद्रयान-3 मोहीमेअंतर्गत साध्य केलेले यश आणि आगामी गगनयान कार्यक्रम यामुळे आज देशाने अंतराळ संशोधन क्षेत्रातील जगतिक पातळीवरच्या आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवले असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताने कार्यक्षमता, नवोन्मेष आणि किफायतशीरपणाच्या बळावर गुंतागुंतीच्या मोहिमा यशस्वीपणे राबवण्याची आपली क्षमता सातत्याने सिद्ध केली असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

प्रशासन आणि विकासासाठी अंतराळ तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर केला जाणारा वापर हे भारताचे एक अनोखे वैशिष्ट्य असल्याचे ते म्हणाले. देशाने व्यापक स्वरुपात पायाभूत सुविधांचे नियोजन, प्रकल्पांवरची देखरेख आणि सार्वजनिक सेवा वितरणाच्या कामांमध्ये अंतराळ आधारित ॲप्लिकेशनचे यशस्वीरित्या एकात्मिकरण घडवून दाखवले आहे, इतरत्र कुठेही असे चित्र फारसे दिसत नाही ही बाबही त्यांनी अधोरेखित केली.

अलिकडेच राबवलेल्या पीएसएलव्ही मोहिमेतील त्रुटींचे विश्लेषण पूर्ण झाले आहे. या त्रुटींमागच्या मूळ कारणांचा शोध घेतला गेला आहे अशी माहिती त्यांनी दिली. या त्रुटी सुधारण्यासाठीच्या उपाययोजना देखील हाती घेतल्या गेल्या आहे. या मोहिमेतून मिळालेल्या शिकवणीचा फायदा आगामी मोहिमांमध्ये होईल, त्यामुळे देशाचा अंतराळ कार्यक्रम अधिक भक्कम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विज्ञानाच्या क्षेत्रात देशाने साध्य केलेले यश हे देशाचा आर्थिक विकास, तंत्रज्ञान क्षेत्रातली आत्मनिर्भरता आणि जागतिक पातळीवरील स्पर्धात्मकतेत सातत्यपूर्णतेने मोलाचे योगदान देत असल्याचेही ते म्हणाले. स्टार्टअप्स, संबंधित उद्योग क्षेत्र आणि संशोधन संस्थांचा वाढता सहभाग यामुळे नवोन्मेषाची एक मजबूत परिसंस्था उभी राहात असून, ही परिसंस्था विकसित भारत 2047 च्या संकल्प साकार करण्याच्या वाटचालीली पुढची दिशा देण्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचेही त्यांनी नमूद केले.

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी राईज कॉन्क्लेव्ह 2026 या परिषदे दरम्यान प्रसारमाध्यमांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. विकसित भारत 2047 साठी नवोन्मेष आणि उद्योजकतेपासून प्रेरित विकास (Innovation & Entrepreneurship Driven Growth for Viksit Bharat 2047) ही या परिषदेची संकल्पना आहे. या परिषदेच्या माध्यमातून नवोन्मेष विषयक परिसंस्थेअंतर्गत परस्पर सहकार्याला बळकटी देण्याच्या उद्देशाने तसेच विज्ञान क्षेत्रातल्या संशोधनाचे प्रत्यक्ष सामाजिक आणि आर्थिक फलनिष्पत्तीत जलद गतीने रूपांतर घडवून आणण्याच्या उद्देशपूर्तीसाठी संशोधक, स्टार्टअप्स, या उद्योग क्षेत्रातील आघाडीची व्यक्तिमत्वे, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते एकत्र आले आहेत. या कार्यक्रमात 125 पेक्षा जास्त स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान विषयक नवोन्मेषकांनी भाग घेतला. या सगळ्यांनी एरोस्पेस तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डीप-टेक आणि कृषी-खाद्यान्न नवोन्मेष या क्षेत्रांसाठी त्यांनी निर्माण केलेल्या उपाययोजना मांडल्या. या परिषदेच्या निमित्ताने प्रामुख्याने संशोधनासाठीच्या उद्योग क्षेत्रासोबतच्या भागीदारींना बळकटी देणे आणि नवोन्मेषापासून प्रेरित विकासाला गती देणे या मुद्यांवर चर्चा केली गेली.

## शेगावात मध्यरात्री 70 लाखांच्या प्रतिबंधित पानमसाल्यासह ट्रक जप्त

**बुलढाणा :** पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या शेगाव शहरात अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे मोठी कारवाई केली. पोलीसांनी यात तब्बल 70 लाख 13 हजार 920 रुपयांचा प्रतिबंधित पानमसाला, तंबाखू आणि मालवाहू ट्रक जप्त केला. ही कारवाई शेगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री करण्यात आली.

माहितीनुसार, 13 जून रोजी रात्री 10.10 वाजताच्या सुमारास अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग किंता वसावे हे पोलीस कर्मचाऱ्यांसह अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करत होते. यावेळी वरवट बकाल रोडवरील यादव बेकरीसमोर संशयास्पदरीत्या उभा असलेला अशोक लेलँड ट्रक (MH-40-GT-2965) अडवून त्याची



तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. शासकीय आदेशांचे उल्लंघन करून हा माल विक्री आणि वाहतुकीसाठी नेला जात असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल

बाजीराव गोल्ड पानमसाला – 50 पोते

मस्तानी तंबाखू – 11 पोते

नजर 1000 पानमसाला – 50 पोते

N-05 प्रीमियम तंबाखू – 50 पोते

प्रीमियम नजर पानमसाला

अशोक लेलँड मालवाहू ट्रक

**एकूण जप्त मुद्देमालाची किंमत :** 70,13,920 रुपये

ट्रक चालक अटकेत

या प्रकरणात पोलिसांनी सुरूर अहमद नूर अहमद (वय 37, रा. फिरदोस कॉलनी, अकोला) या ट्रक चालकाला अटक केली आहे. तसेच M/S Shree Siddheshwar Tobacco Products Pvt. Ltd. (पांढुर्णा, छिंदवाडा, मध्य प्रदेश) येथील मालक, भागीदार आणि संचालकांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींन विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे शेगाव परिसरात अवैध पानमसाला आणि तंबाखू तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## मारहाण प्रकरण: अकोले ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

### मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांचे आदेश

**अहिल्यानगर :-** -तालुक्यातील अकोले ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी भगवान भिवसेन खेडकर यांना ग्रामस्थाला मारहाण केल्याच्या प्रकरणात जिल्हा परिषद प्रशासनाने निलंबित केले आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी याबाबतचा आदेश १० जून रोजी जारी केला. मागील आठवड्यात अकोले ग्रामपंचायत कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली हालचाल रजिस्टरच्या नोंदीची छायांकित प्रत मागण्यासाठी आलेल्या एका ग्रामस्थाला ग्रामपंचायत अधिकारी भगवान खेडकर यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर ( समाजमाध्यम ) मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. तसेच विविध वृत्तपत्र,वृत्तवाहिन्यांवरही या घटनेचे वृत्त प्रसारित झाल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांच्या अहवालाच्या आधारे जिल्हा परिषद प्रशासनाने प्राथमिक चौकशी केली. त्यामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियमाचे उल्लंघन झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने भगवान खेडकर यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अंतर्गत अधिकारांचा वापर करून भगवान खेडकर यांना ग्रामपंचायत अधिकारी पदावरून तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय पंचायत समिती अहिल्यानगर येथे निश्चित करण्यात आले असून संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच निलंबनाच्या काळात त्यांना नियमानुसार निर्वाह भत्ता देण्यात येणार असून कोणतीही खाजगी नोकरी, व्यवसाय किंवा धंदा करता येणार नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, ग्रामपंचायत कार्यालयात घडलेल्या या घटनेमुळे तालुक्यात मोठी चर्चा रंगली होती. व्हायरल झालेल्या व्हिडीओनंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित अधिकाऱ्याला निलंबित केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एनडीएच्या पहिल्या बॅचमध्ये 14 महिला अधिकारी सज्ज

देहरादून : सर्वोच्च न्यायालयाच्या २०२१ मधील ऐतिहासिक निर्णयामुळे नॅशनल डिफेन्स अकादमीमध्ये (एनडीए) महिलांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. यानुसार, एनडीएच्या पहिल्या महिला तुकडीतील १४ कॅडेट्सनी कठोर प्रशिक्षण पूर्ण करून आर्मी आणि एअरफोर्समध्ये अधिकारी म्हणून यशस्वीरित्या पदभार स्वीकारला आहे. सात दशकांहून अधिक काळ फक्त पुरुषांसाठी खुले असलेल्या राष्ट्रीय रक्षा अकादमी (एनडीए) मधून प्रशिक्षण घेतलेल्या पहिल्या महिला बॅचमधील १४ कॅडेट्स आता लष्कर आणि वायुदलात अधिकारी पदावर सज्ज झाल्या. इंडियन मिलिटरी अकादमी (आयएमए), देहरादून येथे नुकत्याच झालेल्या पासिंग आऊट परेडमध्ये ९ महिला कॅडेट्सची लेफ्टनंट म्हणून नियुक्ती करण्यात आली.भारतीय वायुसेना (इंडियन एअर फोर्स) हैदराबाद येथील एअर फोर्स अकादमी (एएफए), डुंडीगल येथे ५ महिला कॅडेट्स फ्लाइंग ऑफिसर म्हणून कमीशन झाल्या. या सर्व महिला अधिकाऱ्यांना थेट परमनंट कमिशन देण्यात आले. विशेष म्हणजे या पहिल्या महिला अधिकारी आहेत ज्यांना एनडीएच्या माध्यमातून पहिल्या दिवसापासूनच कायमस्वरूपी कमिशन मिळाले.

## प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या उपचारावेळी गोंधळ; डॉक्टर-परिचारिकेच्या वादाचा व्हिडिओ व्हायरल

**पान 1 वरून ->**

मुद्द्यावरून महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. पुनम मुंडे आणि परिचारिका सुकेशनी साळवे यांच्यात शाब्दिक वाद सुरू झाला. काही वेळातच हा वाद चिघळला आणि दोघींमध्ये झटापट झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. हा प्रकार रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसमोर घडल्याने आरोग्य केंद्रात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

उपस्थित कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र या गोंधळाचा परिणाम प्रसूतीसाठी दाखल असलेल्या महिलेच्या उपचार प्रक्रियेवर झाल्याची चर्चा परिसरात सुरू झाली. संबंधित महिलेची प्रकृती लक्षात घेऊन तिला पुढील उपचारासाठी प्रथम चिकलठाणा येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) पाठविण्यात आले. तेथे रात्री शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती करण्यात आली. माता आणि नवजात बाळाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली.

घटनेनंतर डॉक्टर आणि परिचारिकेमधील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. काही तासांतच हा व्हिडिओ जिल्हाभर चर्चेचा विषय ठरला. सरकारी आरोग्य संस्थेत रुग्णसेवेपेक्षा कर्मचाऱ्यांतील वाद चर्चेत येत असल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे, लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अंतर्गत मतभेदांचा विषय नवीन नसल्याची चर्चा स्थानिक स्तरावर आहे. यापूर्वीही कर्मचाऱ्यांमधील वाद आणि त्याचा परिणाम कामकाजावर होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे ताज्या घटनेनंतर पुन्हा एकदा आरोग्य केंद्राच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रुग्णाच्या वडिलांनी या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. "मुलीला प्रसूतीसाठी आरोग्य केंद्रात आणले होते. मात्र तेथील वादामुळे उपचार प्रक्रियेत विलंब झाला. त्यानंतर आम्हाला एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात जावे लागले. रुग्णसेवेला प्राधान्य मिळाले पाहिजे. या घटनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई व्हावी," अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, या प्रकरणात संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्याची माहिती मिळाली आहे. व्हायरल व्हिडिओमुळे हा विषय आता केवळ लाडसावंगीपुरता मर्यादित न राहता जिल्हाभर चर्चेचा विषय बनला असून नागरिकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## मान्सूनच्या आगमनासाठी 20 जून उजाडणार ?

मुंबई : अरबी समुद्रातील मान्सूनची शाखा सक्रिय असली तरी महाराष्ट्रातील मान्सूनचा पुढील प्रवास लांबल्याचे दिसत आहे. राज्यात मान्सून पोहोचला असला तरी नागरिकांना उकाडा आणि दमट हवामानापासून अद्याप दिलासा मिळालेला नाही. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, मान्सूनचा पुढील प्रवास १९ ते २० जून पर्यंत लांबू शकतो. भारतीय हवामान विभागाने (IMD) काही दिवसांपूर्वीच माहिती दिली होती की, महाराष्ट्रात मान्सून काही दिवस पुढे सरकला आहे. मात्र १३ जूनच्या अद्ययावत अहवालात महाराष्ट्राचा उल्लेख वगळण्यात आला असून राज्यातील काही भागांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

**मुंबईत दमट उकाडा कायम :** मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत १६ जूनपर्यंत उष्ण व दमट वातावरण राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यानंतर मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असली तरी मोठ्या प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता कमी आहे. मुंबईतील किमान तापमान गेल्या सात दिवसांपासून ३० अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक नोंदवले जात आहे. यामुळे मुंबईकरांना पावसासाठी आणखी वाट बघावी लागणार आहे.

**राज्यात उष्णता कायम :** मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे रविवारी उष्णतेची तीव्रता वाढू शकते. तर अकोला, अमरावती, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यांत सोमवारपर्यंत उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे.

अमरावती आणि बुलढाणा येथे ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

# उपांत्य फेरीत कोल्हापूर, नागपूर, धुळे व मुंबई शहर संघांची धडक

## राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीचे सामने रंगले; उद्याच्या लढतींकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या पुढाकारातून आयोजित राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीचे सामने उत्साहात पार पडले. या सामन्यांमध्ये कोल्हापूर, नागपूर, धुळे आणि मुंबई शहर संघांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला.

पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात कोल्हापूर संघाने यवतमाळवर ४ गोलांच्या फरकाने मात करत उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात नागपूरने जळगावचा ५ गोलांच्या फरकाने पराभव करून पुढील फेरीतील स्थान पक्के केले.





तिसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत धुळे संघाने यजमान छत्रपती संभाजीनगर संघावर ९ गोलांच्या फरकाने विजय मिळविला. तर चौथ्या आणि अखेरच्या सामन्यात मुंबई शहर संघाने वर्धा संघाचा तब्बल १३ गोलांच्या फरकाने पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली.

सर्व सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, वेगवान खेळ आणि सांघिक समन्वयाचे दर्शन घडविले. त्यामुळे उद्या होणाऱ्या उपांत्य व अंतिम फेरीच्या सामन्यांबाबत क्रीडाप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे.

स्पर्धेत पंच प्रमुख म्हणून राज्य हँडबॉल संघटनेचे मिलिंद शिंदे आणि सुयश साळवे यांनी जबाबदारी सांभाळली. समन्वय प्रमुख तथा ग्राऊंड इन्चार्ज म्हणून निखिल म्हस्के यांनी काम पाहिले. निवास व्यवस्थापक म्हणून अश्वजीत गायकवाड यांनी जबाबदारी पार पाडली, तर अमित प्रधान यांनी भोजन व्यवस्थेचे नियोजन केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्य आयोजक अजिंक्य सावे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजक सचिव डॉ. सत्यजीत पगारे, मनीष पाटील, संजय सातदिवे, डॉ. मीनाक्षी मुलियार, डॉ. रंजन बडवने, डॉ. उज्वला सातदिवे आदी परिश्रम घेत आहेत.

## सय्यद वासिमुद्दीन यांना एलएलबी परीक्षेत ए+ श्रेणी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील युवा पत्रकार सय्यद वासिमुद्दीन नईमुद्दीन यांनी जालना येथील डॉ. ढाकणे लॉ कॉलेजमध्ये आयोजित एलएलबी परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत ए प्लस (A+) श्रेणी प्राप्त केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयासह संपूर्ण छत्रपती संभाजीनगर शहरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सय्यद वासिमुद्दीन यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असतानाच शिक्षणालाही प्राधान्य देत कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्यांच्या या यशाची दखल घेत महाविद्यालयाच्या प्राचार्या क्रांतीलक्ष्मी मुदिराज, प्रा. शरद कवनकर, ट्रस्टी गजानन मांटे, प्रा. संदेश तुपे, प्रा. एस. एल. बोर्डे तसेच प्रा. खरात यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशाबद्दल शहरातील पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सय्यद वासिमुद्दीन यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# देवळाई-सातारा परिसरात तीव्र पाणीटंचाई; प्रश्न न सुटल्यास जनआंदोलनाचा इशारा

## महापौरांकडे कृती समितीची धाव; टँकर संख्या वाढविण्यासह जलयोजनांची कामे गतीने पूर्ण करण्याची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देवळाई-सातारा व बीड बायपास परिसरातील नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून खाजगी टँकरचे दरही गगनाला भिडले आहेत. पैसे देऊनही दोन ते तीन दिवस टँकर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर देवळाई-सातारा जनसेवा युवा कृती समितीने प्रभाग क्रमांक २६ चे नगरसेवक आप्पासाहेब विनायकराव हिवाळे पाटील यांच्यामार्फत महापौर समीर राजूरकर यांची भेट घेऊन पाणीप्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली.



कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी महापौरांसमोर परिसरातील गंभीर परिस्थितीचे सविस्तर चित्र मांडले. देवळाई-सातारा भागातील पाण्याच्या टाक्यांची बांधकामे अत्यंत संथ गतीने सुरू असून काही ठिकाणी कामे अद्याप सुरूही झालेली नाहीत, असेही निदर्शनास आणून देण्यात आले. नवीन पाइपलाइन व जलटाक्यांची कामे तातडीने पूर्ण करून संपूर्ण परिसराला लवकरात लवकर नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याचे नियोजन करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

महापौर समीर राजूरकर यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधला. महानगरपालिकेच्या टँकरची संख्या वाढवून परिसरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच सुरू असलेल्या जलटाक्यांच्या बांधकामांचा आढावा घेऊन ती कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, महानगरपालिकेने पाणीप्रश्न गांभीर्याने न घेतल्यास आणि तातडीने उपाययोजना न केल्यास येत्या काळात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देवळाई-सातारा जनसेवा कृती समितीने दिला.

यावेळी नगरसेवक आप्पासाहेब विनायकराव हिवाळे पाटील, मोहन साळवे, सविता कुलकर्णी, पदमसिंह राजपूत यांच्यासह कृती समितीचे राजीव थिटे पाटील, आबासाहेब देशमुख, एकनाथ साळुंके, राजेंद्र फिरोदिया, महेश चिद्रवार, आकाश बिराजदार, नामदेव पवार, संतोष इसादकर आदी उपस्थित होते.

# जिल्हाभर सामूहिक स्वच्छता मोहीम; आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांतून स्वच्छतेचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यांच्या अधिनस्त उपकेंद्रांच्या कार्यक्षेत्रात सामूहिक स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली.



या अभियानाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला.

अभियानाची सुरुवात स्वच्छता जनजागृती रॅलीने करण्यात आली. रॅलीद्वारे नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व, घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर निर्मिती, ओला व सुका कचरा विलगीकरण तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. "स्वच्छता हीच सेवा", "स्वच्छ परिसर – निरोगी समाज" आणि "ओला व सुका कचरा वेगळा करा" अशा घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली.

यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या अंतर्गत व बाह्य परिसरात प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. परिसरातील कचरा, प्लास्टिक, कागद, काच तसेच इतर घनकचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. वाढलेले गवत व अनावश्यक वस्तू हटवून परिसर स्वच्छ, नीटनेटका आणि आरोग्यदायी करण्यात आला.

स्वच्छता ही केवळ एकदिवसीय उपक्रम नसून ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, हा संदेश या अभियानातून देण्यात आला. "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" या संकल्पनेला बळकटी देत जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

सर्व सहभागींच्या सहकार्यामुळे ही सामूहिक स्वच्छता मोहीम यशस्वीरीत्या पार पडली असून "स्वच्छ परिसर – निरोगी समाज" या संकल्पनेला अधिक बळ मिळाले आहे. या लोकचळवळीत नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले.

# प्रलंबित मागण्यासाठी एसटी कर्मचाऱ्यांचे घंटानाद आंदोलन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** एसटी कर्मचाऱ्यांच्या वर्षांवर्षापासूनच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्या साठी राज्य सरकारचे लक्ष वेधणार असल्याची माहिती एसटी संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

याविषयी सविस्तर माहिती अशी की संबंध महाराष्ट्रामध्ये वर्षांवर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यासाठी एसटी कर्मचाऱ्या असंतोष वाढतच असून या मागण्या शासनाने त्वरित मागणी मागण्या मान्य कराव्यात म्हणून एसटी संघटनेच्या विविध संघटनाने तीन टप्प्यात आंदोलन छेडणार असल्याचे निवेदन जिंतूर आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांना एका निवेदनाद्वारे देऊन इशारा दिला आहे. आपल्या विविध मागण्या बाबत 2017 पासून वर्ग दोन कनिष्ठ वेतन लागू करा एसटीचे अस्तित्व टिकवण्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करा मध्यवर्ती कार्यशाळेत नवीन बस बांधणीसाठी चेसिसचा पुरवठा करून.



जन सुरक्षा अधिनियम 2024 राज्यात लागू करा महागाई भत्ता एक रकमे तातडीने अदा करा घर भाड्याचा दर दहा टक्के वीस टक्के तीस टक्के करून एक तर्फी अदा करा 2016 पासून एकतर्फी कमी करण्यात आलेली वेतन वाढीचा दर तातडीने 3टक्के करून निश्चित करा एसटी कामगारांचे वेतन राज्य सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे सन्मान करा तसेच राज्य सरकारी कर्मचारी प्रमाणे वेतन भाडे भत्ते व सेवा सुविधा तात्काळ लागू करा आधी प्रलंबित मागण्यासाठी पुढील आंदोलनाचा एल्गार करण्यात आला आहे पहिल्या टप्प्यात 15 जून रोजी घंटा आंदोलन तर दुसऱ्या टप्प्यात 22 जून रोजी बुधवार जाहीर सभा तर 29 जून रोजी धरणे आंदोलने छेडल्या जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

कामगार संघटना अध्यक्ष तळेकर सचिव अनिल घुगे तर काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास देशमुख सचिव ज्ञानेश्वर पिंगळे व कामगार सेना अध्यक्ष रमेश साडे सचिव सुनील घुगे तर कास्ट टाईप तालुका अध्यक्ष कमलाकर खानकुटे सचिव तथागत कांबळे आदींनी निवेदनावर साक्षर केले आहेत यावेळी मदन मुंडे संदीप भांबळे दिगंबर रणबावळे राहुल लिखे आधी उपस्थित होते.

# वर्षानुवर्षाचा दुर्धर आजारावर प्रभावीपणे औषधोपचार करणारी होमिओपॅथिक पद्धती : प्रतापराव जाधव

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** होमिओपॅथिक औषधोपचार पद्धतीने माणसाला दीर्घायुष्य जगण्यासाठी बळ दिले आहे म्हणून या पद्धतीवर माणसाने विश्वास ठेवला पाहिजे दुसऱ्या तेव्हा तिसऱ्या स्टेपला आल्यावर शेवटच्या टप्प्यामध्ये होमिओपॅथिक औषध उपचार पद्धतीकडे वळतो परंतु तोच आजार जर प्रथम स्टेजला होमिओपॅथिक उपचार पद्धतीकडे आला तर त्यांच्यामध्ये निश्चितच रोग्यास त्याचा निश्चितच फायदा होईल.

13 जून रोजी गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव शाळा या ठिकाणी आयोजित इरुस का प्रायव्हेट लिमिटेड या फार्मचे उद्घाटन केल्यानंतर देशाचे केंद्रीय आयुष तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना बोलताना व्यस्त केले या कार्यक्रमासाठी मेघना दीदी बोर्डीकर परभणी चे लाडके आमदार डॉ राहुल पाटील गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे माजी खासदार सुरेश जाधव मुंजाजी भाले माणिकराव पुंडे बाबुराव राठोड कल्याण मोरे जिल्हा परिषद सदस्य राजेश फड गंगाखेड नपचे उपनगराध्यक्ष सत्यपाल साळवे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव भोसले एड. सय्यद अकबर चित्राबाई गोरेगावकर उमाकांत कोल्हे शाहू मुंडे हे प्रमुख पाहुणे यावेळेस उपस्थित होते होमिओपॅथीचे डॉक्टर एक अर्धा तास पाऊण तास अगदी तुमचा पूर्ण इतिहास तुमच्या कुटुंबाचा इतिहास हा आजार कशामुळे झाला असेल कशामुळे होऊ शकतो याचा सगळे तपासून त्यानंतर त्याच्या उपचार केले जातात अनेक वर्षापासूनच्या दूरधर आजाराला समोर नष्ट करण्याचे काम होमिओपॅथिक मध्ये केले जाते पण दुर्दैवाने आपण पाहतो की पारंपारिक उपचार पद्धती अतिशय चांगल्या प्रकारे अतिशय प्रभावीपणे औषधोपचार केले जातात पण लोकांचा विश्वास होमिओपॅथिक नसून तुरंत आराम घेणाऱ्या ऍलोपॅथी आहे असे प्रतिपादन होमिओपॅथीचे डॉक्टर संजय पवार यांनी केले.

# आपला वारसा जपणे ही आपली जबाबदारी : प्रा. आशुतोष पाटील

## औरंगाबाद लेणीवर 'शहरनामा' चा पहिला हेरिटेज व फोटो वॉक उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बौद्ध लेण्यांतील चैत्यगृह हे त्या काळातील धार्मिक वास्तुकलेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जाते. चैत्यगृहातील स्तूप हा बौद्ध परंपरेतील एक प्रमुख घटक असून विविध कालखंडांमध्ये त्याच्या रचनेत बदल होत गेले. औरंगाबाद लेणी समूहातील लेणी क्रमांक ४ मधील स्तूप प्राचीन वास्तुकलेचा एक उल्लेखनीय नमुना आहे. औरंगाबाद लेणी समूहातील लेणी क्रमांक ४ मधील स्तूप हे तब्बल दोन हजार वर्षांपूर्वीची रचना असून ही रचना केवळ आर्थिक बळावर नव्हे तर केवळ




आंतरिक श्रद्धेतून आकारास आली. शतकानुशतके लोटली तरी ही रचना भक्कमपणे उभी असून आपण आपला हा दैदीप्यमान वारसा जोपासला पाहिजे आणि ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन इतिहास व पुरातत्व संशोधक तथा एमजीएम विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्व विभागाचे सहाय्यक प्रा. आशुतोष पाटील यांनी यावेळी केले.


एमजीएम विद्यापीठ इतिहास व पुरातत्व विभाग, आख्यान फाऊंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट आणि अँडगाईड मीडिया प्रा. लि. व भारत पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद लेणीवर हेरिटेज वॉक व फोटो वॉकचे आज आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. आशुतोष पाटील यांनी सर्वांशी संवाद साधला.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, रमाकांत रौतल्ले, अँडगाइड मीडियाचे ओम परदेशी, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्टचे अध्यक्ष डॉ.निवृत्ती गजभारे, भारत पर्यटन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी स्नेहल पाटील व सर्व संबंधित उपस्थित होते.

प्रा. आशुतोष पाटील पुढे बोलताना म्हणाले, औरंगाबाद लेणी म्हणजे दोन हजार वर्षांची संस्कृती, भाषा, व्यापार, स्थापत्यकलेचा प्रवास आहे. या लेण्या व्यापारी मार्गावर होत्या. कान्हेरी लेण्यातील

# दुर्बीण द्वारे प्रथमच किडनीच्या कर्करोगावर यशस्वी उपचार : डॉ.भगवान कांबळे

**परभणी :** जिल्ह्याच्या ठिकाणी मोठ्या प्रसंगी वैद्यकीय इलाजासाठी मोठ्या मोठ्या शहरात जाण्याशिवाय कुठला पर्याय नव्हता रुग्णाची हेळसांड व कुचंबना होत होती अशात जिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात तुरा खवणारी व परभणीकरांसाठी अत्यंत गौरव शाली व अशी घटना समोर आली समोर आली पन्नास रुग्णांवर अशी किडनीच्या कर्करोगावरची शस्त्रक्रिया प्रथमच परभणीतच लॅप्रोस्कोपी संपूर्णपणे दुर्बीण द्वारे शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली आहे परभणीत असेच नवीन आशेचा किरण दाखवणारी परभणी आय सी यु व ड्रामा केअर हॉस्पिटलमध्ये



झालेल्या ऐतिहासिक शस्त्रक्रियेमुळे आता जिल्ह्यातील रुग्णांना गंभीर स्वरूपाच्या आजारांसाठी व उपचारासाठी मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरात उपचारासाठी जाण्याची गरज उरली नाही सविस्तर माहिती अशी की एका 50 वर्षीय रुग्णावर तीव्र पोटदुखीचा त्रास होत असल्याने त्यांना परभणी आयसीयू व ड्रामा केअर सेंटर रुग्णालयात ओपीडीमध्ये दाखल करण्यात आले होते

डॉक्टरांनी तातडीने रोगाचे अचूक निदान करण्यासाठी सोनोग्राफी व इतर आवश्यक तपासण्या केल्या परंतु तपासणीचा अहवाल धक्कादायक आला रुग्णाच्या एका बाजूच्या किडनीला कर्करोगाचे मोठी गाठ असल्याने निष्पन्न झाले या रुग्णाचे वय पाहता पारंपारिक पद्धतीने मोठा धीर देऊन ऑपरेशन करणे अत्यंत धोका गायक आणि क्लिष्ट स्वरूपाचे रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी आणि त्याला वैद्यकीय टीमने एक मोठा धाडसी निर्णय घेतला नेतृत्व करणारे प्रसिद्ध असे शल्यचिकित्सक डॉक्टर भगवान कांबळे यांनी व अनुभवातून कौशल्यातून अत्यंत सूक्ष्म पद्धतीने वापर करून अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी( दुर्बीण द्वारे ) पद्धतीने करण्याचे ज्यामध्ये कर्करोगाचे झालेले संपूर्ण दुर्बीणच्या साह्याने बाहेर काढली जाते या अत्याधुनिक पद्धतीमुळे रुग्णाला अत्यंत कमी टाके पडले शस्त्रक्रिया दरम्यान होणारा तर्कस्त्राव व त्रास नग्न राहिला आणि वाढत्या वयातही रुग्ण अत्यंत वेगाने व लवकर बरा होण्यास मदत या तज्ञ डॉक्टरांची टीम वर्क आणि अत्याधुनिक यंत्रणा हे ऐतिहासिक शस्त्रक्रियेला यशस्वी करण्यासाठी परभणीतील तज्ञ डॉक्टरांच्या एक्सपर्ट टीमने अहोरात्र कष्ट घेतले सज्ज करणे पासून ते आयुष्य मधील अत्यंत महत्त्वाच्या पूर्व तयारीची जबाबदारी डॉक्टर सागर चौधरी डॉक्टर गोविंद कदम भूलतज्ञ डॉक्टर रवींद्र पाचलेगावकर आणि डीजेषण डॉक्टर विकास चोपडे यांच्या संपूर्ण वैद्यकीय टीमने जबाबदारी चोख बजावली. परभणीत प्रथमच घडलेली आहे.

# सरसकट कर्जमुक्तीसाठी शिवसेनेची मराठवाडाव्यापी 'बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली'

## शिवसेना जिल्हाधिकारी कार्यालयांवर धडक

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना नेते - राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली मराठवाडाभर शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने 'बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली' चे आयोजन करण्यात आले आहे. "नको अटी - नको शर्ती, आम्हाला द्या संपूर्ण कर्जमुक्ती" या घोषवाक्याखाली मंगळवार, 16 जून रोजी सकाळी 10 वाजता मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर ही रॅली काढण्यात येणार आहे.

राज्यातील शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडला असून कर्जबाजारीपणा, पिकांना मिळणारा कमी दर, खतांचा तुटवडा, अपुरा वीजपुरवठा आणि विमा कंपन्यांकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीसासाठी शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ही धडक ट्रॅक्टर रॅली आयोजित करण्यात आली आहे. या ट्रॅक्टर रॅलीमध्ये शिवसैनिक, पक्षाचे पदाधिकारी, सर्व अंगीकृत संघटना पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी तसेच शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, सुनील काटमोरे, परशुराम जाधव, रोहिदास चव्हाण, बबनराव थोरात, प्रदीपकुमार खोपडे, खासदार संजय जाधव, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार कैलास पाटील, आमदार राहुल पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, महेश नळगे, गणेश वरेकर, उल्हास गिराम, रणजीत पाटील, बालाजी रेड्डी, बबन बारसे, भुजंग पाटील, ज्योतिबा खराटे, संदेश देशमुख आणि गोपू पाटील यांनी केले आहे.

# ग्राहकाचे शोषण थांबवण्यासाठी एमआरपी व्यवस्था सुधारित करा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** बाजारपेठेत लागू असलेल्या कमाल किरकोळ विक्री मूल्य (एम आर पी ) व्यवस्था ग्रामपंचायत संरक्षण ऐवजी त्याच्या आर्थिक शोषणाचे साधन बनत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केंद्र सरकारकडे एमआरपी कायद्यात तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे या या मागणीचे निवेदन प्रधानमंत्री यांना केंद्रीय मंत्री वित्तमंत्री व केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्र्यांच्या नावे परभणी कार्यालयामार्फत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना शुक्रवारी सादर करण्यात आले यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉक्टर विलास मोरे परभणी जिल्हा पालक अधिकारी डॉक्टर संगीता अवचार सो सोपानराव टोले डॉक्टर संदीप चव्हाण भगवान करंजे मधुकर मुळे आशा होनमाने जनार्दन आवरून अब्दुल रहीम मंचक जगताप गंगाधर काणेकर शाम राणेर रमाकांत जोशी मोतीराम शिंदे राजेभाऊ डुकरे वसंत गायकवाड कोंडीबा शिंदे भागवत चव्हाण धोंडीराम कळंबे सचिन सोनकांबळे शिवाजी दिवटे उत्तमराव मस्के अनुरथ सुरनर अनंत लोखंडे यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या जनं निवेदनात म्हटले आहे की ग्राहकाच्या हित रक्षणासाठी लागू करण्यात आलेली एमआरपी व्यवस्था आज अनेक उत्पादक कंपन्याकडून ग्राहकांची दिशाभूल करण्यासाठी वापरली जात आहे वस्तू उत्पादन खर्चाच्या तुलनेत वाजवी आणि उगवलेल्या किमती




छापल्या जातात त्यानंतर मोठ्या सवलतीचे आम्हीच दाखवून ग्राहकांना आकर्षित केले जाते व प्रत्यक्षात या प्रक्रियेत आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप ग्राहक पंचायतने केला आहे विशेष करून औषधे सौंदर्यप्रसाद ने दैनंदिन वापराच्या वस्तू उत्पादन खर्चाच्या अनेक पटीने एमआरपी निश्चित केली जात असल्याने ग्राहकांना वस्तूची वास्तविक किंमत समजणे कठीण होते परिणामी ग्राहकांना छापील किंमत अथवा तथाकथित सवलतीच्या किमतीत वस्तू खरेदी करण्याशिवाय पर्याय राहत नसल्याने निवेदनात नमूद करण्यात आले आहे या समस्येवर उपाय म्हणून प्रत्येक उत्पादनावर एमआरपी सोबत उत्पादन खर्च नमूद करणे बंधन करावे कंपन्याची मनमानी किंमत निर्धारावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वातंत्र्य कायदेशीर प्राधिकरण स्थापन करावे तसेच औषधे अन्नपदार्थ आणि अत्यावश्यक वस्तूंसाठी विशेष किंमत नियंत्रण यंत्रणा उभी करावी अशा प्रमुख मागण्या करण्यात आले आहेत याशिवाय ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उत्पादक व विक्रेत्यावर कठोर दंडात्मक कारवायाची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे पंचायत च्या वतीने या विषयावर देशभरात जनजागृती अभियान निवेदन मोहिमा पत्रकार परिषदा तसा सोशल मीडियावर अभियान राबवण्यात येत असून 12 जून रोजी दिल्ली येथे जंतर मंतर व राष्ट्रीय स्तरावरील आंदोलन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली केंद्र सरकारने ग्राहकाचे हिताचे रक्षण करण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करून एमआरपी व्यवस्थेत आवश्यक कायदेशील सुधारणा कराव्यात अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे.

# दोन बहिणी सख्या बहिणींचा चुलतीसह गोदावरी पात्रात बुडून मृत्यू

## सोनपेठ तालुक्यातील मोहोळा येथील घटना

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी





**परभणी** : सोनपेठ तालुक्यातील मोहळा येथील गोदावरी नदीच्या पात्रात अंघोळीसाठी उतरलेल्या दोन संख्या बहिणी व चुलतीचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला ही घटना रविवार 14 जून रोजी सकाळी साडे सातच्या सुमारास घडली. अधिक माहितीनुसार तालुक्यातील मोहोळा येथील शेतकरी उत्तम देविदास जाधव यांच्या मुली उत्कर्षा वय 18 वर्षे समीक्षा वय 16 वर्ष या रविवारी सकाळी साडे सातच्या सुमारास त्यांची चुलती सिंधू दत्ता जाधव यांच्यासोबत गावाजवळील गोदावरी नदीकाठी आंघोळीसाठी गेल्या होत्या आंघोळ करत असताना दोघीचा पाण्याचा अंदाज चुकल्याने त्या नदीच्या खोल पाण्यात बुडू लागल्या ही बाब लक्षात येताच सिंधू दत्ता जाधव व 45 वर्ष यांनी दोन्ही मुलींना वाचवण्यासाठी नदीत उडी घेतली पण पाण्याचा प्रवाह खोलीमुळे त्यांना बाहेर येणे शक्य झाले नाही आणि त्या देखील पाण्यात बुडाल्या गावकरी मोठ्या संख्येने नदीकाठी जमा झाले ग्रामस्थानी अथक प्रश्न करून तिघींचा शोध घेतला असता त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आले त्यानंतर तिघी नाही तातडीने रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय सोनपेठ येथे आणण्यात आले वैद्यकीय अधिकारी डॉक्टर उमाकांत राठोड यांनी सविच्छेदन केले घटनास्थळी पोलिसांनी भेट दिली याप्रकरणी दौलत जाधव यांनी दिलेल्या माहितीवरून सोनपेठ पोलिसांनी आकस्मित मूर्तीची नोंद केली आहे.

# समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते अय्युब खान मियां खान यांचे निधन



**छत्रपती संभाजीनगर** : जुनाबाजार परिसरातील ज्येष्ठ समाजसेवक तथा समाजवादी पक्षाचे वरिष्ठ नेते अय्युब खान मियां खान (वय ६९) यांचे १४ जून रोजी दुपारी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात शोककळा पसरली असून अनेक मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली आहे. अय्युब खान हे प्रसिद्ध नाबू पहलवान यांचे जावई होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन कन्या, एक पुत्र, नातवंडे असा मोठा परिवार आहे. तसेच ते इस्माईल राजा यांचे मेहुणे होते. मरहूम अय्युब खान मियां खान यांची नमाज-ए-जनाजा सोमवार, दि. १५ जून रोजी सकाळी १० वाजता बुडीलेन येथील जामा मशिदीत अदा करण्यात येणार आहे. त्यानंतर चितेखाना कब्रस्तान येथे त्यांच्यावर दफनविधी (तदफीन) करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांच्या निधनाबद्दल विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शोक व्यक्त केला असून, अल्लाह तआला यांनी मरहूमांना जन्नतमध्ये उच्च दर्जा प्रदान करावा व त्यांच्या कुटुंबियांना हा दुःखद प्रसंग सहन करण्याची ताकद द्यावी, अशी प्रार्थना करण्यात येत आहे.

# जिन्सी भागात 17 लाखांहून अधिक रेशनिंग व अन्नधान्य साठा जप्त, तिघे अटकेत

## किराडपुरा परिसरातील गोडावूनवर छापा; अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार उघड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिन्सी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे शाखेने जीवनावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत मोठी कारवाई करत सुमारे 17 लाख रुपयांहून अधिक किंमतीचा रेशनिंगचा माल व अन्नधान्य साठा जप्त केला असून 3 आरोपींना अटक करण्यात आली आहे. दि. 13/06/2026 रोजी सकाळी 11.30 वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने किराडपुरा परिसरातील 5, रहेमानिया परिसर, हबीबिया मशिदीजवळ, MR फंक्शन हॉलजवळील गोडावूनवर छापा टाकला.



या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी समीर बाबर कुरेशी (रा. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) फहाद लईक शुतरी (रा. किराडपुरा, छत्रपती संभाजीनगर) फरदीन गणी पठाण (रा. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) आणि या आरोपीचा शोध घेणे चालू आहे आवेज कुरेशी (रा. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) कलीम छोटू कुरेशी व त्याचे इतर साथीदार (रा. किराडपुरा परिसर, छत्रपती संभाजीनगर) गोपनीय माहितीवरून मिळालेल्या खात्रीनंतर पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी संदीप विश्वनाथ शिंदे आणि महिला व बाल विकास अधिकारी गणेश पंगळे यांना माहिती देण्यात आली.

या कारवाईत सुमारे 15,75,300 रुपये किंमतीचा रेशनिंग माल व वाहन जप्त करण्यात आले आहे. तसेच त्याच परिसरातील दुसऱ्या खोलीत अंगणवाडीतील बालकांसाठी तसेच गर्भवती व स्तनदा मातांसाठी वितरित होणारा अन्नसाठा (तांदूळ व मिक्स पावडर) अवैधरित्या साठवलेला आढळून आला. बाल विकास अधिकारी नागरी उत्तर, छत्रपती संभाजीनगर यांच्या पंचनाम्यानुसार 1,31,200 रुपये किंमतीचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

या दुसऱ्या गुन्ह्यात सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी संदीप विश्वनाथ शिंदे आणि महिला व बाल विकास अधिकारी गणेश पंगळे यांच्या अहवालावरून जिन्सी पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ताठे, पोलीस ठाणे जिन्सी हे करीत असून सर्व आरोपींना न्यायालयाने 4 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, प्रविण पाथरकर, संदीप तायडे, प्रदीप दंडवते, योगेश नवसारे, विजय निकम, विनोद परदेशी, राहुल बंगाळे, जालिंदर गोरे तसेच विशेष पथकातील अरुण भिसे, दिनकर आवारे, अभिषेक बाठे, सागर शेंडे, माया माळी, मनीषा नरोडे यांनी केली.

# मुरमाचा उपसा जोमात, हायवे धावती रातरात...

## तहसीलदारांना दिसत नाही की सगळं काही ठरतंय संगनमतात?

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : हर्सूल, जटवाडा, सावंगी भागात अवैध मुरूम उत्खननाचा काळा धंदा दिवसेंदिवस बोकाळत चालला असून, रात्रीच्या अंधारात डोंगरांचे अक्षरशः तुकडे केले जात आहेत. डोंगर भुईसपाट केले जात आहे. मोठे हायवे आणि डंपर रात्रभर मुरूम वाहतूक करत असतानाही महसूल प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

छत्रपती संभाजीनगरचे तहसीलदार डॉ. शिवानंद बिडवे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गौणखनिज माफियांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले होते. मात्र प्रत्यक्षात सावंगी, हरसुल, जटवाडा परिसरातील परिस्थिती वेगळेच चित्र मांडत आहे. डोंगर पोखरण्याचे काम दिवस-रात्र सुरू असून, महसूल यंत्रणा मात्र याबाबत अनभिज्ञ असल्याचे दाखवत आहे.



**सावंगीतील डोंगरांचे होत असलेले नुकसान आणि रात्री सुरू असलेला मुरूम उपसा याकडे जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा महसूल प्रशासनाच्या भूमिकेबाबत निर्माण झालेले संशय अधिकच गडद होण्याची शक्यता आहे. पुरावे, छायाचित्रे आणि स्थानिकांच्या तक्रारी असूनही कारवाई होत नसेल, तर नेमके कोणाचे संरक्षण केले जात आहे? हा प्रश्न आता परिसरातील नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत.**

स्थानिक नागरिकांच्या मते, शासनाने निश्चित केलेल्या खोलीच्या मर्यादा धाब्यावर बसवून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले आहे. डोंगरांच्या नैसर्गिक रचनेलाच धोका निर्माण झाला असून पर्यावरणीय परिणामांचीही भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली मुरूम वाहतूक स्थानिकांच्या नजरेतून सुटत नाही; मात्र महसूल विभागाला ती कशी दिसत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

सावंगीसह जटवाडा परिसरातील काही भागांमध्ये भरलेल्या रॉयल्टीपेक्षा जास्त प्रमाणात मुरूम काढण्यात आल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. जर हा आरोप खरा असेल, तर महसूल विभागाच्या तपासणी व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. उत्खननाचे फोटो, वाहनांची ये-जा आणि प्रत्यक्ष परिस्थितीचे पुरावे उपलब्ध असतानाही प्रशासनाची निष्क्रियता नागरिकांच्या रोषाचे कारण ठरत आहे.

या प्रकरणात संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी आणि महसूल यंत्रणेची जबाबदारी निश्चित होणार का, हा प्रश्नही उपस्थित होत आहे. कारण अवैध उत्खनन ही एका दिवसाची घटना नसून, दीर्घकाळ सुरू असलेली प्रक्रिया असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

# हर्सूल-सावंगी परिसरातून अल्पवयीन तरुणीचे अपहरण

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : हर्सूल-सावंगी परिसरातून १७ वर्षीय तरुणीचे अपहरण झाल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी फुलंब्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तरुणीचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर शहरातील एकतानगर भागात राहणारी १७ वर्षीय तरुणी यंदा बारावी परीक्षेत अनुत्तीर्ण झाली होती. शाळेला सुट्ट्या लागल्याने ती सावंगी (हर्सूल) परिसरातील आजीच्या घरी राहण्यासाठी गेली होती.

१० जून रोजी सकाळी सुमारे १० वाजेपर्यंत तरुणी घरात एकटीच होती. मात्र दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ती घरातून बेपत्ता असल्याचे आजीच्या निदर्शनास आले. आजीने तत्काळ तिच्या आईशी संपर्क साधून मुलगी घरी आली आहे का, याची चौकशी केली. मात्र मुलगी कुठेही नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तिचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली.

दरम्यान, तरुणीच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याचे आढळले. शेजारी, नातेवाईक आणि परिचितांकडे चौकशी करूनही तिचा काहीच ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे मुलीच्या आईने फुलंब्री पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंदवला असून तरुणीचा शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे करीत आहेत.

# अजिंठा लेणी परिसरात सोविनार स्मृतीचिन्हांचे दुकान उभारल्याने वाद

हिंदी प्रकाशवार्ता : शेख हक्कानी

**फर्दापूर** : जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात सोविनार (स्मृतीचिन्ह) विक्रीसाठी कंटेनर स्वरूपातील दुकान उभारण्यात आल्याने स्थानिक व्यापारी व हस्तकला व्यावसायिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

अजिंठा लेणी परिसरातील वाढते प्रदूषण लक्षात घेऊन सन २००२ मध्ये लेणीच्या पायथ्याशी असलेली दुकाने व छोटी हॉटेल्स सुमारे चार किलोमीटर अंतरावर स्थलांतरित करण्यात आली होती. मात्र गुरुवारी एमएच ४६ डीसी ६०८६ क्रमांकाच्या आयशर ट्रकद्वारे कंटेनर स्वरूपातील सोविनार स्मृतीचिन्हांचे दुकान लेणीच्या पायथ्याशी एका जागेवर उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले.



याबाबत अजिंठा लेणी हस्तकला असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष विलास वराडे यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापकांना निवेदन देऊन संबंधित दुकान हटविण्याची मागणी केली आहे.

अजिंठा लेणी परिसरात इतर वाहनांना प्रवेशबंदी असताना अशा प्रकारे वाहनांची ये-जा कशी झाली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात व्यवस्थापनाकडे विचारणा केली असता, "संबंधित कामासाठी मोबाईल संदेशाद्वारे सूचना प्राप्त झाल्या होत्या," असे सांगण्यात आले. मात्र लेणी परिसरात वाहन प्रवेशासाठी संबंधित अधिकाऱ्यांची, विशेषतः उपजिल्हाधिकाऱ्यांची लेखी परवानगी आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सध्या केवळ मोबाईल संदेशांच्या आधारे कामकाज होत असल्याने नियमभंगाच्या तक्रारी वाढत असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे स्वतः लक्ष देऊन जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी परिसरात नियमांची पायमल्ली होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे 179 गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## 10 वी-12 वी परीक्षेत 87 ते 99 टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव; चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर

हिंदी प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे दहावी व बारावी परीक्षेत ८७ ते ९९ टक्के गुण मिळवून यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. समर्थनगर येथील श्री समर्थ राम मंदिर येथे झालेल्या या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. विश्वेश घाणेकर, ब्राह्मण समाज समन्वय समितीचे अध्यक्ष मिलिंद दामोदरे, विहिंप मंत्री अभिषेक कादी, माणिक रत्नपारखी, संजय मांडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर आणि सामाजिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले.



### शिष्यवृत्तीसाठी 57 अर्ज; आणखी सहा विद्यार्थ्यांना संधी

**अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाकडे शिष्यवृत्तीसाठी ५७ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना यावेळी शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. उर्वरित पात्र विद्यार्थ्यांची छाननी करून आणखी सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी दिली.**

या उपक्रमासाठी एकूण २४० गुणवंत विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७९ विद्यार्थी पालकांसह समारंभास उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पेन देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी केले, तर आभार प्रदर्शन अंजली गोरे यांनी केले. प्रमुख अतिथींचे स्वागत सुरेखा पारवेकर, स्मिता नगरकर, मोहन काळे, गायत्री न्यायाधीश, अंजली देशपांडे, छाया खोचे, वैभव कुलकर्णी आणि ॲड. अश्विनी कुलकर्णी यांनी केले.

यावेळी ब्राह्मण महासंघाकडे शिष्यवृत्तीसाठी ५७ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती देण्यात आली. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असून, पात्रतेनुसार आणखी सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी दिली.कार्यक्रमाबाबत उपस्थित पालक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे स्वागत केले.




मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911